# अकोला महानगरपालिका, अकोला

## विकास परवानगी आदेश

# आरंभ प्रमाणपत्र

(Commencement Certificate)

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 अन्वये व मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 253,254 बाबत)**

**प्रकरण क्रं 14/219/20-21**

दिनांक - 17/06/2021

**प्रति,**

**श्री राजेश सत्यनारायणजी लोहीया व इतर 06**

रा. लोहीया नगर, अकोला

**कामाचे वर्णन**

अकोला येथील **मौजे अकोला** येथे सर्व साधारण शर्ती व अटीनुसार सोबतचे नकाशा प्रमाणे **तळमजला +6 चे निवासी** वापराचे बांधकाम करण्यासाठी पुढील शर्तीस अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

1. अकोला शहराच्या **मौजे अकोला** येथील **शिट क्रं. 29-A नझुल प्लॉट नं. 2/1, लेआऊट प्लॉट नं. 53** चे जागेवर सोबतच्या मंजूर नकाशानुसार बांधकाम करणेसाठी परवानगी देण्यात येत आहे.
2. मंजूर झालेल्या नकाशानुसार जागेचा विकास करण्यात यावा, त्यात या महानगरपालिकेची लेखी व स्पष्ट परवानगी शिवाय कोणताही बदल करु नये.
3. संदर्भित जागेच्यावर उल्लेखिल्याप्रमाणे विकास करण्यास ह्या प्रमाणपत्रा अन्वये जी परवानगी देण्यात आली आहे ती फक्त नगररचनेच्या दृष्टीकोणातून देण्यात आली आहे. सदर जागेवरील आवेदकाच्या मालकी हक्कास मंजूरी देण्यात आली असा या प्रमाणपत्राचा अर्थ नाही किंवा तसा हक्क या परवानगी आदेशामुळे प्राप्तही होऊ शकत नाही.
4. महानगरपालिकेच्या जागेवर किंवा कोणत्याही रस्त्यावर, गल्लीत, सरकारी जागेवर, नझूल जागेवर अथवा कोणाच्या खाजगी जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करण्यात आल्यास त्या अतिक्रमणाची जबाबदारी अर्जदारावर राहील.
5. इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर त्या इमारतीच्या उपयोगासाठी महानगरपालिकेची परवानगी मिळाल्याशिवाय सदर इमारतीचा वापर सुरु करु नये.
6. या प्रमाणे पत्रान्वये देण्यात आलेली परवानगी एक वर्षापर्यंतच अंमलात राहील.
7. इमारतीचे सांडपाणी अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या नालीस जोडावे अथवा स्व:खर्चाने सोकपिट बांधावा.
8. भुकंप रोधक नियमाचे पालन करावे.
9. बांधकाम पुर्ण झाल्यावर बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये. अन्यथा बांधकाम पुर्ण झाल्यापासून रु.३००/- प्रतिदिन दंड आकारण्यात येईल.
10. छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलम (रेनवॉटर हार्वेस्टींग) करणे करिता उपायोजना करणे आवश्यक राहील. सदर तरतुद आपण केले नसल्याचे गृहत सदर परवानगी ओदश व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.
11. बांधकामामध्ये प्लाय अश विटा व प्लाय अश आधारीत साहित्याचा वापर करणे बंधनकार राहील.
12. मालकी हक्काबाबत व जागेचे हद्दीबाबत वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार स्वत: जवाबदार राहील.
13. सोबतचे मंजूर नकाशानुसार समास अंतरे सोडणे आवश्यक राहील अन्यथा सदर परवानगी रद्द समजण्यात येईल.
14. सदर इमारतीमध्ये अग्नी प्रतिबंधक उपाययोजना करणे अनिवार्य राहील.
15. विद्युत लाईन पासून सुरक्षीत अंतर सोडून बांधकाम करावे लागेल अन्यथा अपघात झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील.
16. इमारत बांधकाम स्थळावर बांधकामाबाबत व परवानगी बाबत सविस्तर माहिती दर्शविणारा फलक लावणे अनिवार्य राहील.
17. लिफ्ट चे वापरामुळे कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्याबाबतची संपुर्ण जवाबदारी आपणावर राहील.

**(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)**

अकोला महानगरपालिका नगररचना विभाग
नियोजन व विकास विभाग
स्थापना
१-१०-२००१

**प्र.सहाय्यक संचालक नगररचना**
अकोला महानगरपालिका, अकोला

**प्रकरण क्रं. 14/219/20-21** अन्वये मंजूर झालेल्या नकाशाची प्रत आदेश मिळाला

अर्जदाराची स्वाक्षरी

प्रतिलिपी,

1. क्षेत्रिय अधिकारी (पुर्व झोन), मनपा अकोला
2. कराधिक्षक, कर वसुली विभाग मनपा अकोला